# 'मेरी माटी मेरा देश' शपथ संपन्न




**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘मेरी माटी मेरा देश' उपक्रमांतर्गत 'पंचप्राण शपथ' घेण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी प्रा.विनोद काळे यांनी या उपक्रमाचे महत्त्व सांगून प्राध्यापक व विद्यार्थी यांना भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्याचे स्मरण करून पंचप्रण शपथ दिली. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. लक्ष्मणकुमार सुदाम, डॉ. बालाजी कत्तूरवार, डॉ. नीरज उपलंचवार, डॉ. सुरेश काशिदे, कार्यक्रमाधिकारी डॉ. व्यंकट खंदकुरे, प्रा. गणेश क्यादारे, प्रा.हाके यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner